पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २१

**सभावृत्तांत**

दिनांक - **०१/०३/२०१९** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०१/०३/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.सागर बाळासाहेब गवळी
५. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
६. मा.कदम निकिता अर्जुन
७. अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.लोणकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.५) वृक्षसंवर्धन विभागाचे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील पान क्र.४-५ अ.क्र.१४ व पान क्र.६-७ अ.क्र.२६ व ३६ या तरतुदीमधून प्रस्तावित कामांस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.६) सहा.आयुक्त/ उप आयुक्त पदावरील पदोन्नतीबाबत. – मा.सागर गवळी , मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) कार्यकारी अभियंता(स्थापत्य) च्या पदावर पदोन्नतीबाबत. – मा.राजेंद्र लांडगे , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक - ८५ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०१/०३/२०१९ विभाग – जलनिःसारण
सुचक : मा.संगिता ताम्हाणे अनुमोदक : मा.मनिषा पवार
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/कावि/१०/१०/२०१९ दि.२१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात एकुण ७२ झोपडपट्या असुन त्यातील नागरिकांचे सोयीसाठी मनपामार्फत या झोपडपट्यामध्ये सोयीसुविधा पुरविल्या जातात. नागरी दलित वस्ती सुधारणा अंतर्गत पिंपळे गुरव येथील दलित वस्त्यांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी

जलनि:सारण नलिका टाकणे विषयक सेवा सुविधा पुरविणे आवश्यक असल्याने सदरहु कामास मा.विधी समितीची प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी पिंपळे गुरव येथील दलित वस्त्यामध्ये आवश्यक ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणे या कामाची अंदाजपत्रकिय र.रू.३०,००,०००/- (अक्षरी र.रू. तीस लाख फक्त) प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०१/०३/२०१९ विभाग – जलनि:सारण

सुचक : मा.निकिता कदम अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/कावि/१०/१०/२०१९ दि.२१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात एकुण ७२ झोपडपट्या असुन त्यातील नागरिकांचे सोयीसाठी मनपामार्फत या झोपडपट्यामध्ये सोयीसुविधा पुरविल्या जातात. नागरी दलित वस्ती सुधारणा अंतर्गत प्रभाग क्र.३० मधील सिद्धार्थनगर, गुलाबनगर, संजयनगर व उर्वरित ठिकाणी ड्रेनेज व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेविषयक सेवा सुविधा पुरविणे आवश्यक असल्याने सदरहु कामास मा. विधी समितीची प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रभाग क्र.३० मधील सिद्धार्थनगर, गुलाबनगर, संजयनगर व उर्वरित ठिकाणी ड्रेनेज व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे. या कामास अंदाजपत्रकिय र.रू.३०,००,०००/- (अक्षरी र.रू. तीस लाख फक्त) प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०१/०३/२०१९ विभाग – पाणीपुरवठा

सुचक : मा.सागर गवळी अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/कावि/१०/१२/२०१९ दि.२१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

दलित वस्ती विकास योजना कार्यक्रम २०१८-१९ अंतर्गत दलित वस्तीमध्ये सर्वंकष विकासासाठी येथील अनुसूचित जातीसाठी आरक्षित प्रभागात जलनिःसारण विषयक नलिका पुरविणेकामी प्रस्तावित करणेकामी शासन निर्णय क्र.विघयो/१०२०००/१५९२ /प्रक्र/१८९/नवि/४ दि.०५.०३.२००२ जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय पुणे-१ यांच्याकडील अर्धसमास पत्र क्र.पसन/कावि/४१७/२०१८ दि.२५.०९.२०१८ चे अन्वये कळविले आहे. त्यानुसार प्रभाग क्र.२५ वाकड येथील अनुसुचित जातीसाठी आरक्षित प्रभागात जलनिःसारण नलिका टाकणे कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१८–१९ व SSR २०१८-१९ च्या दर सुची नुसार जलनिःसारण विभागामार्फत तयार करण्यात आले असून त्याची अंदाजपत्रकीय र.रू.२९,८१,०३९/- इतकी आहे. शासन निर्णय क्र. विघयो/ १०२००० / १५९२ / प्रक्र / १८९ / नवि / ४ दि.०५.०३.२००२ अन्वये सन २०१८-१९ मध्ये लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती विकास योजना अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्राप्त रक्कम रूपये ४.०० कोटी नियत व्ययामधून सदर काम करणेत येणार आहे. तरी दलित वस्ती विकास योजना कार्यक्रम २०१८-१९ अंतर्गत प्रभाग क्र.२५

वाकड, येथील अनुसूचित जातीसाठी आरक्षित प्रभागात आवश्यक ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणेकामी र.रू.२९,८१,०३९/- (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख एक्याऐंशी हजार एकोणचाळीस फक्त) अंदाजपत्रकिय रकमेस प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८८ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०१/०३/२०१९ विभाग – पाणीपुरवठा

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/कावि/१०/कावि/१३/२०१९ दि.२१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

दलित वस्ती विकास योजना कार्यक्रम २०१८-१९ अंतर्गत दलित वस्तीमध्ये सर्वंकष विकासासाठी येथील अनुसूचित जातीसाठी आरक्षित प्रभागात जलनिःसारण विषयक नलिका पुरविणेकामी प्रस्तावित करणेकामी शासन निर्णय क्र.विघयो/१०२०००/१५९२ /प्रक्र/१८९/नवि/४ दि.०५.०३.२००२ जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय पुणे-१ यांच्याकडील अर्धसमास पत्र क्र.पसन/कावि/४१७/२०१८ दिनांक २५.०९.२०१८ चे अन्वये कळविले आहे. त्यानुसार प्रभाग क्र.१९ उद्योगनगर, दळवीनगर येथील अनुसुचित जातीसाठी आरक्षित प्रभागात जलनिःसारण नलिका टाकणे कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१८–१९ व SSR २०१८-१९ च्या दरसुची नुसार जलनिःसारण विभागामार्फत तयार करण्यात आले असून त्याची अंदाजपत्रकीय र.रू.३०,००,०००/- इतकी आहे. शासन निर्णय क्र.विघयो/१०२०००/ १५९२/प्रक्र/१८९/नवि/४ दि.०५.०३.२००२ अन्वये सन २०१८-१९ मध्ये लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती विकास योजना अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्राप्त र.रू.४.०० कोटी नियत व्ययामधून सदर काम करणेत येणार आहे. तरी दलित वस्ती विकास योजना कार्यक्रम २०१८-१९ अंतर्गत प्रभाग क्र. १९ उद्योगनगर, दळवीनगर येथील अनुसूचित जातीसाठी आरक्षित प्रभागात आवश्यक ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणे या कामाच्या र.रू.३०,००,०००/- (अक्षरी र.रू.तीस लाख फक्त) अंदाजपत्रकिय रकमेस प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ८९ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०१/०३/२०१९ विभाग – स्थापत्य उद्यान

सुचक : मा.सागर गवळी अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा. अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/उद्यान/२८/२०१९ दि.२८/०२/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

वक्षसंवर्धन विभागाचे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील पान क्र.४-५ अ.क्र.१४ च पान क्र.६-७ अ.क्र.२६ व ३६ याकामांसाठी करण्यात आलेल्या उद्यान विभागाकडील तरतुदी वापरून स्थापत्य उद्यान विभागामार्फत खालील नमूद कामे करणे नियोजित आहे. या विभागामार्फत खालील नमूद कामे करणेसाठी सदर लेखाशिर्षा अंतर्गत खाली नमूद केलेप्रमाणे कामास प्रशासकीय मान्यता

मिळणे आवश्यक आहे. तरी खाली नमूद केल्याप्रमाणे कामास मा.विधी समितीची प्रशासकीय मान्यता मिळणेचा प्रस्ताव आहे.

| अ.क्र. | लेखशिर्ष | पान क्र./अ.क्र. | कामाचे नांव | प्रशासकीय मान्यता र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | वृक्षसंवर्धन | ४-५/१४ | **खड्डे खोदाई / भराई करणे** | |
| | | | १) 'अ' प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | २५,००,००० |
| | | | २) 'ब' प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | २५,००,००० |
| | | | ३) 'क' प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | २५,००,००० |
| | | | ४) 'ड' प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | २५,००,००० |
| | | | ५) 'इ' प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | २५,००,००० |
| | | | ६) 'फ' प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | २५,००,००० |
| | | | ७) 'ग' प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | २५,००,००० |
| | | | ८) 'ह' प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | २५,००,००० |
| २ | वृक्षसंवर्धन | ६-७/२६ | **तार कुंपण देखभाल व दुरुस्ती** | |
| | | | १) प्रभाग क्र.१२ तळवडे गायरान येथील सीमा भिंत दुरुस्ती करणे (भाग १) | ५०,००,००० |
| | | | २) प्रभाग क्र.१२ तळवडे गायरान येथील सीमा भिंत दुरुस्ती करणे(भाग २) | ५०,००,००० |
| ३ | | ६-७/३६ | **गायराने मोकळी जागा अंतर्गत रस्ते करुन वृक्षारोपण करणे** | |
| | | | १) प्रभाग क्र.१२ तळवडे गायरान अंतर्गत पाथवे(रस्ता) करणे व इतर कामे करणे | ५०,००,००० |

तरी वर नमूद केल्याप्रमाणे कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९० विषय क्रमांक - ०६

दिनांक - ०१/०३/२०१९

सुचक : मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक : मा.सागर गवळी

संदर्भ – मा. राजेंद्र लांडगे , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर शासन मंजूर असलेले रिक्त पदांवर अथवा नव्याने शासन मंजूर होणा-या आकृतीबंधानुसार उपायुक्त अभिनामाची पदे शासन मंजूर होणार असल्याने व सदरची पदे महापालिका सभेने निर्माण केली असल्याने त्या मंजूर होणा-या सहाय्यक आयुक्त / उपायुक्त या पदावर नियमानुसार सेवाजेष्ठता शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणारे पात्रताधारक, पदोन्नती पूर्व प्रशासन अधिकारी या पदावरील सेवाजेष्ठ अधिकारी श्री.श्रीनिवास रामचंद्र दांगट , श्री.राजेश अंकुश आगळे व श्री. सिताराम देवचंद बहुरे यांना नियमानुसार पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९१ विषय क्रमांक - ०७

दिनांक - ०१/०३/२०१९

सुचक : मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक : मा.सागर गवळी

संदर्भ – मा. राजेंद्र लांडगे , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थपनेवरील उप अभियंता(स्थापत्य) पदावर दिनांक ०१/०१/२०१६ रोजी काम करणा-या अधिका-यांची अंतिम सेवाजेष्ठतासूची दिनांक २४/०३/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर अंतिम सेवाजेष्ठतासूचीमधील तीन सेवाजेष्ठ पदविधारक कार्यकारी अभियंता हे नजीकच्या काळात सेवानिवृत्त होत असून सदर रिक्त होणा-या कार्यकारी अभियंता(स्थापत्य) अभिनामाच्या मंजूर पदावर (वेतनश्रेणी १५६०० – ३९१०० ग्रेड पे ६६००) खालीलप्रमाणे उपअभियंता पदोन्नतीस पात्र आहेत. त्यामुळे सेवाजेष्ठतेनुसार १) श्रीम.वाघ संध्या नितीन – उप अभियंता , २) श्री.चौरे शिवाजी राजाराम – उप अभियंता ३) श्री.देसले विलास नामदेव– उप अभियंता यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१३६/२०१९
दिनांक : ०२/०३/२०१९



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.